

**कोल्हापूर : जननायक बिरसा मुंडा यांना शिवाजी विद्यापीठातर्फे अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व इतर.**

# जननायक बिरसा मुंडा यांना अभिवादन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, संत तुकाराम अध्यासनाचे डॉ. नंदकुमार मोरे, उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2019
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा सोमवारी वर्धापनदिन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापनदिन सोमवार, दि. १८ रोजी राजर्षी शाहू सभागृह येथे साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त आयोजित समारंभाला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू प्रा. डॉ. उद्धव भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के आहेत. कार्यक्रमातंर्गत विविध क्षेत्रातील लोकांचा सत्कार केला जाणार आहे. त्यामध्ये गुणवंत शिक्षक, प्रशासन सेवक, गुणवंत प्राचार्य, विद्यापीठ शिक्षक यांना गौरवण्यात येणार आहे. बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. कार्यक्रमापूर्वी सकाळी ८.३० वाजता ध्वजवंदन होणार आहे.

# डॉ. पोळ यांची आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागातील प्रा. डॉ. उर्मिला राजेंद्र पोळ यांची बर्सिलोना (स्पेन) येथे होणाऱ्या 'मुडलमूट ग्लोबल २०१९' परिषदेमध्ये शोधनिबंध सादर करण्यासाठी निवड झाली आहे. 'ॲक्टिव्ह लर्निंग अप्रोच : एच ५ पी ॲक्टिव्हिटी इनमुडलश याविषयावर डॉ. पोळ शोधनिबंध सादर करणार आहेत. या परिषदेमध्ये सहभागी होणाऱ्या प्रा. पोळ या शिवाजी विद्यापीठातील पहिल्याच आणि देशाच्या एकमेव प्रतिनिधी शिक्षिका आहेत. त्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत यांचे मार्गदर्शन लाभले.